क्रमांक : २३२८०/ई-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २६ मे, २०१६.

प्रेषक :

**प्रधान सचिव,**
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति :

**विधानपरिषदेचे सर्व सन्मा.सदस्य**

**विषय : मा.सदस्यांकडून तारांकित प्रश्नांच्या सूचना स्वीकारण्याबाबत.**
**संदर्भ : म.वि.स पत्र क्र.२३१८४/ई-१, दिनांक २५ मे, २०१६.**

**महोदय/महोदया,**

निदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सोमवार, **दिनांक १८ जुलै, २०१६ रोजीपासून विधान भवन, मुंबई** येथे सुरु होणाऱ्या आगामी अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक व त्या दिवसाकरीता बॅलटमध्ये समाविष्ट असलेले मा.मंत्री तसेच प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक नमुद असलेला चक्रानुक्रम पत्रक भाग दोनद्वारे सर्व मा.सदस्यांना **गुरुवार, दिनांक २६ मे, २०१६ रोजी वितरित करण्यात येत आहे (प्रत सोबत जोडली आहे).**

महाराष्ट्र विधानपरिषदेतील तारांकित प्रश्नांच्या बॅलटपध्दतीबाबत विचारविनिमय करण्यासाठी **दिनांक १२ मे, २०१०** रोजी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या दालनात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत विधानपरिषदेत एकच बॅलटपध्दती अवलंबिण्याचा निर्णय घेण्यात आला होता. **परंतु उक्त बॅलट पध्दतीबाबत गतसत्रात काही सन्मा. सदस्यांनी सभागृहात आक्षेप नोंदवत या पध्दतीत बदल करण्यासंदर्भात हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता. त्याअनुषंगाने दिनांक ७ एप्रिल, २०१६ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत प्रस्तुत कार्यपध्दतीची संपुर्ण तपासणी करुन मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी निर्णय घ्यावा असे ठरविण्यात आले होते. त्यानुसार शुक्रवार, दिनांक २० मे, २०१६ रोजी झालेल्या बैठकीत मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विधानपरिषदेतील तारांकित प्रश्न सूचना स्वीकारण्याच्या व तारांकित स्वीकृत प्रश्नांच्या बॅलट पध्दतीत बदल करुन सन २०१६ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशनापासून विधानसभेप्रमाणे तारांकित प्रश्न सूचना स्वीकारणे व तारांकित स्वीकृत प्रश्नांच्या बॅलट पध्दतीचा अवलंब करण्यात यावा** असे निदेश दिले आहेत. त्यानुसार तारांकित प्रश्न सूचना देण्यासाठी *गुरुवार, दिनांक ९ जून, २०१६ रोजीपासून कार्यालयीन वेळेत QIS या संगणक प्रणालीवर Online पध्दतीने व offline पध्दतीद्वारे ई-१ कक्षात स्वीकारण्यात येतील. Offline* **पध्दतीने प्रश्न सूचना देण्यासाठी या सचिवालयातील "ई-१" कक्षात मा.सदस्यांना वा त्यांच्या प्राधिकृत प्रतिनिधींना तारांकित प्रश्नांचे प्रपत्र उपलब्ध करुन देण्यात येतील. प्रत्येक अधिवेशनासाठी या सचिवालयाकडून स्वतंत्रपणे छापण्यात येणाऱ्या तारांकित प्रश्नांच्या प्रपत्रातच प्रश्न सूचना स्वीकारण्यात येतील. तसेच प्रश्न**

..२/-

सूचनेवर एकापेक्षा जास्त सदस्यांच्या स्वाक्षऱ्या असतील, तर स्वाक्षरीच्याखाली सदस्यांनी आपले नाव व नावांचा क्रम स्पष्टपणे नमूद करावा जेणेकरुन त्यांची स्वाक्षरी ओळखणे सुलभ होईल व सूचनेसाठी सदस्यांच्या नावांचा क्रम निश्चित करणे सोईस्कर होईल.

मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या निदेशानुसार बॅलट पध्दतीत बदल करण्यात आलेला असून आगामी अधिवेशनातील पहिल्या आठवडयातील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे बॅलट सोमवार, दिनांक ११ जुलै, २०१६ रोजी दुपारी ४.०० वाजता व त्यापुढील आठवड्यांतील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे बॅलट त्यापुढील प्रत्येक सोमवारी दुपारी ४.०० वाजता विधान भवन, मुंबई येथे उप सचिव/अवर सचिव/अवर सचिव (समिती) यांच्या दालनात घेण्याबाबत पत्रक भाग-दोनद्वारे मा.सदस्यांना कळविण्यात येईल असा उल्लेख चक्रानुक्रमात करण्यात आला आहे.

संसदीय कार्य विभागाने तीन आठवडयांचा म्हणजेच दिनांक १८ जूलै, २०१६ ते दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजीपर्यंतचा कार्यक्रम कळविला असला तरी मा.सभापती, विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार सदर कार्यक्रमाशिवाय एका आठवडयाचा जादा कार्यक्रम चक्रानुक्रमात दाखविण्यात आला आहे.

कृपया याची नोंद घ्यावी अशी आपणांस विनंती आहे.

आपला,

(ज.बा.राणे)
अवर सचिव (समिती)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

याची प्रत माहितीसाठी :

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये,
विधान भवन, मुंबई-४०० ०३२.

\\Mls-e1-15\d\Anu 1\Session II - Monsoon - 2016\Monsoon - II Session\(2) Rotation bull part 2.doc

# महाराष्ट्र विधानपरिषद
क्रमांक : ५७

पत्रक भाग दोन

## गुरुवार, दिनांक २६ मे, २०१६/ ५ ज्येष्ठ, १९३८ (शके)

## महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१६ मधील द्वितीय (पावसाळी) अधिवेशनातील (माहे जुलै-ऑगस्ट, २०१६) तारांकित प्रश्नांचा चक्रानुक्रम

७१ महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१६ मधील द्वितीय (पावसाळी) अधिवेशन **(माहे जुलै-ऑगस्ट, २०१६)** कालावधीकरिता माननीय मंत्र्यांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी माननीय सभापतींनी पुढीलप्रमाणे दिवस नेमून दिले आहेत. ज्या दिनांकास प्रश्नांचे उत्तर हवे असेल तो दिनांक विवरणाच्या स्तंभ (३) मध्ये दर्शविलेला असून त्या दिवशी विचारावयाच्या प्रश्नांच्या सूचना या सचिवालयास मिळण्याचा अखेरचा दिनांक विवरणाच्या स्तंभ (४) मध्ये दर्शविलेला आहे. (प्रश्नांच्या सूचना मिळण्याच्या अखेरच्या दिनांकास सुट्टी असेल त्यावेळी त्या पूर्वीचा दिनांक दर्शविण्यात आला आहे.)

आगामी अधिवेशनासंबंधातील दिनदर्शिकेतील आलेल्या कार्यक्रमात बदल झाल्यास त्यानुसार प्रस्तुत चक्रानुक्रमात बदल होईल.

मा.सदस्यांना प्रश्नांच्या सूचना देण्यास मदत व्हावी म्हणून माननीय मंत्री आणि त्यांच्या अधीन असलेले विभाग यांचे विवरणपत्र सोबत जोडले आहे **(पृष्ठ क्रमांक ३)**

बुधवार, दिनांक ९ जून, २०१६ रोजीपासून स्वीकारण्यात येणाऱ्या तारांकित प्रश्न सूचनांपैकी अधिवेशनाच्या पहिल्या आठवडयातील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे बॅलट सोमवार, दिनांक ११ जुलै, २०१६ रोजी दुपारी ४.०० वाजता व त्यानंतर पुढील आठवड्यांतील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे बॅलट त्यापुढील प्रत्येक सोमवारी दुपारी ४.०० वाजता विधान भवन, मुंबई येथे उप सचिव/अवर सचिव/अवर सचिव (समिती) यांच्या दालनात घेण्यात येईल.

तसेच या सचिवालयातील ई-१ कक्षात (कक्ष क्रमांक १३०४) मा.सदस्यांना वा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधींना तारांकित प्रश्नांचे प्रपत्र उपलब्ध करुन देण्यात येतील. प्रत्येक अधिवेशनासाठी या सचिवालयाकडून स्वतंत्रपणे छापण्यात येणाऱ्या तारांकित प्रश्नांच्या प्रपत्रातच प्रश्न सूचना देण्यात याव्यात. प्रत्येक अधिवेशनासाठी छापण्यात येणाऱ्या तारांकित प्रश्नांच्या प्रश्न सूचना देण्यात आल्या नसल्यास, त्या सूचना रद्द करण्यात येतील.

### विवरणपत्र

| गट क्रमांक (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३) | प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| एक | (१) वित्त आणि नियोजन, वने मंत्री<br>(२) ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल कल्याण मंत्री<br>(३) जलसंपदा मंत्री<br>(४) सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री | सोमवार, दिनांक १८ जुलै, २०१६<br>सोमवार, दिनांक २५ जुलै, २०१६<br>सोमवार, दिनांक ०१ ऑगस्ट, २०१६<br>*सोमवार, दिनांक ०८ ऑगस्ट, २०१६ | शुक्रवार, दिनांक १७ जून, २०१६<br>शुक्रवार, दिनांक २४ जून, २०१६<br>शुक्रवार, दिनांक १ जुलै, २०१६<br>शुक्रवार, दिनांक ८ जुलै, २०१६ |

| | | | |
|---|---|---|---|
| दोन | (१) महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री<br>(२) परिवहन मंत्री<br>(३) ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री | मंगळवार, दिनांक १९ जुलै, २०१६<br>मंगळवार, दिनांक २६ जुलै, २०१६<br>मंगळवार, दिनांक ०२ ऑगस्ट, २०१६<br>*मंगळवार, दिनांक ०९ ऑगस्ट, २०१६ | शनिवार, दिनांक १८ जून, २०१६<br>शुक्रवार, दिनांक २४ जून, २०१६<br>शनिवार, दिनांक २ जुलै, २०१६<br>शुक्रवार, दिनांक ८ जुलै, २०१६ |
| तीन | (१) मुख्यमंत्री<br>(२) गृहनिर्माण, खनिकर्म व कामगार मंत्री | बुधवार, दिनांक २० जुलै, २०१६<br>बुधवार, दिनांक २७ जुलै, २०१६<br>बुधवार, दिनांक ०३ ऑगस्ट, २०१६<br>*बुधवार, दिनांक १० ऑगस्ट, २०१६ | शनिवार, दिनांक १८ जून, २०१६<br>शुक्रवार, दिनांक २४ जून, २०१६<br>शनिवार, दिनांक ०२ जुलै, २०१६<br>शुक्रवार, दिनांक ०८ जुलै, २०१६ |
| चार | (१) शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री<br>(२) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री<br>(३) पर्यावरण मंत्री<br>(४) पाणी पुरवठा आणि स्वच्छता मंत्री | गुरुवार, दिनांक २१ जुलै, २०१६<br>गुरुवार, दिनांक २८ जुलै, २०१६<br>गुरुवार, दिनांक ०४ ऑगस्ट, २०१६<br>*गुरुवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ | सोमवार, दिनांक २० जून, २०१६<br>सोमवार, दिनांक २७ जून, २०१६<br>सोमवार, दिनांक ०४ जुलै, २०१६<br>सोमवार, दिनांक ११ जुलै, २०१६ |
| पाच | (१) सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(२) आदिवासी विकास मंत्री<br>(३) उद्योग मंत्री<br>(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री<br>(५) सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री | शुक्रवार, दिनांक २२ जुलै, २०१६<br>शुक्रवार, दिनांक २९ जुलै, २०१६<br>शुक्रवार, दिनांक ०५ ऑगस्ट, २०१६<br>*शुक्रवार, दिनांक १२ ऑगस्ट, २०१६ | मंगळवार, दिनांक २१ जून, २०१६<br>मंगळवार, दिनांक २८ जून, २०१६<br>मंगळवार, दिनांक ०५ जुलै, २०१६<br>मंगळवार, दिनांक १२ जुलै, २०१६ |

* आगामी अधिवेशनाच्या सोमवार, दिनांक १८ जुलै, २०१६ ते शुक्रवार, दिनांक ०५ ऑगस्ट, २०१६ या कालावधीत वाढ झाल्यास पूर्वखबरदारी म्हणून जादा एक आठवडयाच्या प्रश्नसूचना कार्यवाहीत घेण्यात येत आहेत.

विधानभवन,
मुंबई,
दिनांक : २६ मे, २०१६

डॉ.अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

प्रति :

(१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व मा. सदस्य.
(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.
(३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.

## मंत्र्यांची नावे व त्यांच्या अधीन असलेले विभाग

(१) **श्री. देवेंद्र फडणवीस ---- मुख्यमंत्री**

(१) सामान्य प्रशासन विभाग,
(२) नगरविकास विभाग,
(३) गृह विभाग,
(४) विधी व न्याय विभाग,
(५) बंदरे विभाग,
(६) पर्यटन विभाग,
(७) माहिती व जनसंपर्क विभाग
(८) माजी सैनिकांचे कल्याण विभाग,
(९) राजशिष्टाचार विभाग,
(१०) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग व इतर मंत्र्यांना विवक्षितपणे नेमून न दिलेले विभाग व त्यांचे भाग

(२) **श्री. एकनाथराव गणपतराव खडसे --- महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**

(१) महसूल व वन विभाग (महसूल विषयक आणि पुनर्वसन व मदत कार्य आणि भूकंप पुनर्वसन विषयक बाबी)
(२) अल्पसंख्याक विकास विभाग (अल्पसंख्याक विकास आणि औकाफ विषयक बाबी)
(३) कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग
(४) गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क विषयक बाबी)

(३) **श्री. सुधीर सच्चिदानंद मुनगंटीवार --- वित्त आणि नियोजन, वने मंत्री**

(१) वित्त विभाग
(२) नियोजन विभाग
(३) महसूल व वन विभाग (वने विषयक बाबी)

(४) **श्री. विनोद श्रीधर तावडे --- शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री**

(१) शालेय शिक्षण, क्रीडा विभाग
(२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग
(३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (वैद्यकीय शिक्षण विषयक बाबी)
(४) मराठी भाषा विभाग
(५) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (सांस्कृतिक कार्य विषयक बाबी)

(५) **श्री. प्रकाश मंचूभाई मेहता --- गृहनिर्माण, खनिकर्म, कामगार मंत्री**

(१) गृहनिर्माण विभाग
(२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (कामगार आणि खनिकर्म विषयक बाबी)

(६) **श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील --- सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**

(१) सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभाग
(२) सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम वगळून)

(७) **श्रीमती पंकजा गोपीनाथ मुंडे--- ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल कल्याण मंत्री**

(१) ग्रामविकास आणि जलसंधारण विभाग
(२) नियोजन विभाग (रोजगार हमी योजना विषयक बाबी)
(३) महिला आणि बाल कल्याण विभाग

(८) **श्री. विष्णु रामा सावरा --- आदिवासी विकास मंत्री**
आदिवासी विकास विभाग

(९) **श्री. गिरीश भालचंद्र बापट--- अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री**

(१) अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग
(२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (अन्न आणि औषध प्रशासन विषयक बाबी)
(३) संसदीय कार्य विभाग

(१०) **श्री. गिरीष दत्तात्रय महाजन---- जलसंपदा, खार जमीन मंत्री**
जलसंपदा विभाग

(११) **श्री. दिवाकर नारायण रावते --- परिवहन मंत्री**
गृह विभाग (परिवहन विषयक बाबी)

(१२) **श्री. सुभाष राजाराम देसाई --- उद्योग मंत्री**
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (उद्योग विषयक बाबी)

(१३) **श्री. रामदास गंगाराम कदम --- पर्यावरण मंत्री**
पर्यावरण विभाग

(१४) **श्री. एकनाथ संभाजी शिंदे --- सार्वजनिक बांधकाम मंत्री**
सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम विषयक बाबी)

(१५) **श्री. चंद्रशेखर कृष्णराव बावनकुळे --- ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री**
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (ऊर्जा आणि नवीन व नवीकरणीय ऊर्जा विषयक बाबी)

(१६) **श्री. बबनराव दत्ताराव लोणीकर --- पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री**
पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग

(१७) **डॉ. दीपक रामचंद्र सावंत --- सार्वजनिक आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्री**
सार्वजनिक आरोग्य आणि कुटूंब कल्याण विभाग

(१८) **श्री. राजकुमार सुदाम बडोले --- सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री**
सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग